POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-५९ ● मुंबई, बुधवार, ०१ ऑक्टोबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA



## सप्टेंबर अतिवृष्टीत गेला... ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात पुन्हा पाऊस झोडपणार

# मराठवाडा- विदर्भात ठिकठिकाणी अलर्ट



**ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात पुन्हा पावसाचे अलर्ट**

**कोणत्या जिल्ह्याला काय अलर्ट?**

**३० सप्टेंबर -** आज नांदेड वगळता राज्यात कुठेही पावसाची शक्यता नसल्याचा अंदाज हवामान विभागाने दिलाय. नांदेड जिल्ह्याला येलो अलर्ट आहे.

**१ ऑक्टोबर -** रत्नागिरी व सातारा घाटमाथ्यावर पावसाचा यलो अलर्ट, बुलढाणा, वाशिम, हिंगोली, नांदेड, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यांनाही पावसाचा यलो अलर्ट देण्यात आलाय.

**२ ऑक्टोबर -** मराठवाड्यातील हिंगोली परभणी नांदेड लातूर जिल्ह्यांना जोरदार पावसाची शक्यता असून उर्वरित मराठवाड्यात हलक्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. विदर्भातील अकोला, अमरावती, वर्धा ,नागपूर, भंडारा ,गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्याला पावसाचा येलो अलर्ट देण्यात आलाय. तसेच रत्नागिरी व सातारा घाटमाथ्यावर पावसाचा येलो अलर्ट आहे.

**३ ऑक्टोबर -** संपूर्ण विदर्भात पावसाचा येलो अलर्ट, बीड परभणी हिंगोली नांदेड व लातूर जिल्ह्याला मुसळधार पावसाचा इशारा, सिंधुदुर्ग रत्नागिरी तसेच कोल्हापूर व सातारा घाटमाथ्यावर पावसाचा यलो अलर्ट, बहुतांश राज्यात हलक्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रात अतिवृष्टीने दाणादाण उडाली आहे. विशेषतः मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर हाल झाले आहेत. अनेक गावांमध्ये पूर परिस्थिती निर्माण झाली. गावात पाणी शिरल्यामुळे शेकडो नागरिकांना स्थलांतर करावे लागले. मराठवाड्यासह मध्य महाराष्ट्र विदर्भातही पावसाने थैमान घातल्याचे चित्र होते. आता बहुतांश भागात पाऊस ओसरला असला तरी पुढील चार दिवस विदर्भ मराठवाड्यासह तळ कोकणात काही जिल्ह्यांना पावसाचे अलर्ट देण्यात आले आहेत. बंगालच्या उपसागराच्या पश्चिम भागात कमी दाबाचा पट्टा सक्रिय असून पुढील चार दिवस महाराष्ट्रात ठिकठिकाणी पावसाचे अलर्ट हवामान विभागाने दिले आहेत. ३ ऑक्टोबरपर्यंत पावसाचे अंदाज देण्यात आले असून पुन्हा विदर्भ मराठवाड्यात मुसळधार पावसाची शक्यता आहे.

**हवामान विभागाचा अंदाज काय?**

हवामान विभागाचा ताज्या अंदाजानुसार, पुढील सहा दिवस कोकण गोवा मध्य महाराष्ट्रात मुसळधार पावसाची शक्यता आहे. मंगळवार (३० सप्टेंबर) रोजी नांदेड वगळता कुठल्याही जिल्ह्याला पावसाची शक्यता नाही. पण बुधवरपासून मराठवाडा विदर्भातील काही जिल्ह्यांना येलो अलर्ट देण्यात आला आहे.

## बदलापूरमध्ये अनधिकृत फेरीवाल्यावर कारवाईदरम्यान वादंग

## मराठी भाषेबाबत अपशब्द काढल्याच्या आरोपानंतर मनसेची धडक

■**बदलापूर । प्रतिनिधी,**

शहरातील अनधिकृत फेरीवाल्यांविरुद्ध कुळगाव-बदलापूर नगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाची कारवाई सोमवारी पश्चिम भागात सुरू असताना अनपेक्षित वादंग निर्माण झाला. कारवाईदरम्यान एका परप्रांतीय फेरीवाल्याने पालिका कर्मचाऱ्यांशी वाद घातला. त्यावेळी संबंधित फेरीवाला पालिका कर्मचाऱ्यांच्या अंगावर धावून गेला. इतर कर्मचाऱ्यांनी हा वाद रोखला. त्यावेळी या फेरीवाल्याने मराठी भाषेबाबत अपशब्द उच्चारल्याचा आरोप करण्यात आला. या घटनेनंतर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्त्यांनी तत्काळ धडक कारवाई करत संबंधित फेरीवाल्याला बेदम चोप दिला. या प्रकारामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

बदलापुरात गेल्या काही दिवसांपासून फेरीवाल्यांची संख्या वाढली आहे. शहरातील विविध रस्ते फुटपाथ फेरीवाल्यांनी गिळंकृत केले आहेत. या फेरीवाल्यांमुळे रहदारीला त्रास होत असून रस्त्यावर वाहतुकीची कोंडी वाढत आहे. यातील बहुतांश फेरीवाले हे शहराबाहेरून येत असून ते या शहरातून आपला व्यवसाय करत आहेत. यासाठी बहुतांश फेरीवाल्यांना स्थानिक राजकीय पुढाऱ्यांचा फायदा मिळत असल्याचं बोललं जात आहे.

काही दिवसांपूर्वी एका भाजप नगरसेवकाने हे फेरीवाल्यांचं रॅकेट होतं असं म्हणत यामागे मोठा आर्थिक गैरवव्यवहार होत असल्याचा आरोप केला होता. ही समस्या दिवसेंदिवस वाढत असल्याने नगरपालिकेने आपली अतिक्रमण विरोधी कारवाई तीव्र केली होती याच पार्श्वभूमीवर सोमवारी सकाळपासून नगरपालिकेने अनधिकृत फेरीवाल्यांविरुद्ध कारवाईची मोहीम आरंभली होती.

दिवसभर पालिकेची कारवाई सुरू होती. यात अनेक यात अनेक फेरीवाले हटवण्यात आले. ही फेरीवाले हटाव मोहीम बदलापूर पश्चिम येथे सुरू असताना येथील ट्रेंड्स या मोठ्या दुकानासमोर एका हातगाडी वाल्याला हातगाडी हटवण्यासाठी पालिका कर्मचाऱ्यांनी सांगितले मात्र त्याने हातगाडी हटवली नाही. उलट हा फेरीवाला पालिका कर्मचाऱ्यांची हुज्जत घालू लागला.

यावेळी फेरीवाला आणि त्याचे सहकारी पालिका कर्मचाऱ्यांवर धावून गेले तसेच त्यांनी शिवी गाळी देखील केली. तसेच या फेरीवाल्याने मराठी भाषेबद्दल अवमानकारक वक्तव्य केले अशी माहिती पालिका कर्मचाऱ्यांनी दिली. याची माहिती बदलापूर शहरात वाऱ्यासारखी पसरली आणि मनसे कार्यकर्त्यांनी संबंधित फेरीवाल्याला गाठून त्याचा मनसे स्टाईल समाचार घेतला. या घटनेनंतर मनसे पुन्हा एकदा आक्रमक भूमिका घेताना दिसली. परप्रांतीय फेरीवाल्यांच्या विरोधात मनसेने स्पष्ट संदेश दिला आहे की मराठी भाषा आणि संस्कृतीचा अवमान सहन केला जाणार नाही.

पालिकेचे मुख्याधिकारी मारुती गायकवाड यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली असून, संबंधित फेरीवाल्याविरुद्ध शासकीय कामात अडथळा आणल्याचा गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. त्याचबरोबर शहरातील सर्व अनधिकृत फेरीवाल्यांविरुद्ध कारवाई सुरूच राहील, असा स्पष्ट इशारा गायकवाड यांनी दिला.

या कारवाईनंतर नगरपालिकेच्या भूमिकेला पाठिंबा देणारे आवाज उमटत आहेत, तर दुसरीकडे फेरीवाल्यांविषयी कडक धोरणामुळे सामाजिक वातावरण आणखी पेट घेण्याची भीती काहींनी व्यक्त केली आहे.



**मराठी फेरीवाल्यांनाच हटवण्याचा आरोप**

बदलापूर नगरपालिकेच्या या फेरीवाला हटाव मोहिमे विरोधात काही मराठी फेरीवाल्यांनी नाराजी व्यक्त केली. नगरपालिकेंनी काही परप्रांतीय फेरीवाल्यांना न हटवता केवळ मराठी फेरीवाल्यांनाच हटवण्याचा आरोप या फेरीवाल्यांनी केला. तर काही सर्वेक्षण झालेल्या फेरीवाल्यांवर कारवाई केल्यामुळे त्यांनी पालिकेवर संताप देखील व्यक्त केला.


## पूरग्रस्त विद्यार्थ्यांना दिलासा...

## राज्य परीक्षा मंडळाकडून बारावीचा अर्ज भरण्यास मुदतवाढ

■**मुंबई । प्रतिनिधी,**

राज्यातील अतिवृष्टी आणि पूरस्थितीचा परिणाम शिक्षणक्षेत्रावरही झाला आहे. बारावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरण्यास अडचणी येत असल्याने अखेर राज्य शासनाने विद्यार्थ्यांना दिलासा दिला आहे. राज्य परीक्षा मंडळाने अर्ज भरण्याची अंतिम मुदत ३० सप्टेंबरवरून २० ऑक्टोबर २०२५ पर्यंत वाढवली आहे.

राज्यात मराठवाडा, नाशिक, सोलापूर, अहिल्यानगरसह अनेक भागात अतिवृष्टीमुळे पूरस्थिती निर्माण झाली आहे. रस्ते वाहतूक विस्कळीत, शाळा-महाविद्यालयांचे कामकाज ठप्प, तर इंटरनेट आणि वीजपुरवठ्यात अडचणी निर्माण झाल्याने विद्यार्थ्यांना ऑनलाइन अर्ज भरता येत नव्हता. त्यामुळे विद्यार्थी आणि पालकांनी थेट उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मुदतवाढ देण्याची मागणी केली.



या मागणीची दखल घेत शिंदे यांनी शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांना तत्काळ दूरध्वनीवरून निर्देश दिले. त्यानंतर शिक्षण मंत्र्यांनी राज्य परीक्षा मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांच्याशी संपर्क साधून आवश्यक ती कार्यवाही करण्यास सांगितले. शिक्षण विभागाने त्वरेने निर्णय घेत विद्यार्थ्यांना दिलासा देणारे परिपत्रक जारी करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

**इतर महत्त्वाचे निर्णय :**

- नियमित बारावी विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यास २० ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ
- बाह्य पद्धतीने परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मुदत १५ ऑक्टोबरपर्यंत वाढवली
- नवीन परीक्षा केंद्रासाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख १० ऑक्टोबर निश्चित

या निर्णयामुळे राज्यातील हजारो विद्यार्थ्यांचा ताण कमी झाला असून, पूरपरिस्थितीमुळे होणारा शैक्षणिक तोटा काही प्रमाणात टळणार आहे. पालकांनी आणि विद्यार्थी संघटनांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे.

## फडणवीस सरकारने घेतले ५ महत्त्वाचे निर्णय

## सीएम म्हणाले, 'पुढील आठवड्यात...'



"पुढील २ ते ३ दिवसात नुकसानीची माहिती मिळेल. ६० लाख हेक्टरचं नुकसान झाल्याचा अंदाज. पुढील आठवड्यात मदत जाहीर करणार आहोत," अशी माहिती राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. दिवाळीआधी पूरग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याचा आमचा प्रयत्न. आजपर्यंत ओला दुष्काळ कधीही जाहीर झालेला नव्हता. दुष्काळाच्या निकषानुसारच मदत देणार. २ हजार २१५ कोटींची मदत वितरणास सुरुवात केली आहे. दुष्काळी टंचाईबाबतच्या सवलती मिळणार, असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. दिल्लीनं मदत करण्याचा निर्णय घेतला आहे. दिल्लीच्या मदतीची वाट न पाहता मदत करणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.

■**डहाणु। प्रतिनिधी,**

राज्यमंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्र सरकारच्या मदतीची वाट न पाहता राज्य सरकार पुढील आठवड्यापासून पूरग्रस्तांना मदत करणार असल्याचं सांगितलं आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर पत्रकारांशी संवाद साधताना फडणवीसांनी सविस्तर माहिती दिली. या शिवाय मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये पाच महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. याबद्दल जाणून घेऊयात सविस्तरपणेः आरोग्य किटसह गहू, तांदूळ, डाळ देणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी मंत्रिमंडळ बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना सांगितलं. मंत्रिमंडळाच्या बैठकीमधील एकूण पाच निर्णय...

- **वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग :** कर्करोग रोग उपचारासाठी सर्वसमावेशक असे धोरण निश्चित. नागरिकांना कर्करोग रोगासंदर्भात दर्जेदार उपचार मिळणार. त्रिस्तरीय समग्र कर्करोग उपचार सेवा निश्चित. राज्यभरातील १८ रुग्णालयांतून कर्करोगाशी निगडीत विशेषोपचार उपलब्ध होणार. यात महाराष्ट्र कॅन्सर केअर, रिसर्च अँड एज्युकेशन फाऊंडेशन (महाकेअर फाऊंडेशन - MAHACARE Foundation) ही कंपनी स्थापन होणार. कंपनीच्या भागभांडवलासाठी शंभर कोटींचा निधी.
- **उद्योग विभाग :** महाराष्ट्राचे जागतिक क्षमता केंद्र (ग्लोबल कॅपॅब्लिटी सेंटर - GCC) धोरण २०२५ मंजूर. विकसित भारत २०४७ च्या वाटचालीस सुसंगत अशी वाटचाल व्हावी यासाठी गुंतवणूक, बहुराष्ट्रीय सहकार्य या गोष्टीना प्रोत्साहन मिळणार.
- **ऊर्जा विभाग :** औद्योगिक, वाणिज्यिक व इतर वर्गवारीतील ग्राहकांकडून वीज वापरावर अतिरिक्त वीज विक्री कर आकारण्यास मंजुरी. यामुळे प्रधानमंत्री कुसुम घटक-ब व अन्य योजनेंतर्गत सौर कृषीपंपासाठी वीज पुरवठा करण्याकरिता निधी उपलब्ध होणार.
- **नियोजन विभाग :** महाजिओटेक महामंडळ स्थापन करण्यास मंजुरी. भू-स्थानिक तंत्रज्ञान (Geospatial Technology) चा वापर करून प्रशासनात गतिमानता आणणार. या तंत्रज्ञानाचा वापर करून विविध क्षेत्रात धोरणात्मक नियोजन करण्यास आणि निर्णय घेण्यास मदत होणार.
- **विधि व न्याय विभाग :** सातारा जिल्ह्यात फलटण येथे वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय होणार. या न्यायालयासाठी आवश्यक पदांना व त्यासाठीच्या खर्चाच्या तरतुदीस मंजूरी

## अंगावर रॉकेल टाकलं अन्... मंत्रालयाच्या प्रवेशद्वारावरच वृद्धाचा जीव संपवण्याचा प्रयत्न

■**मुंबई । प्रतिनिधी,**

मंत्रालय परिसरातून धक्कादायक बातमी समोर आली आहे. मंत्रालयाच्या प्रवेशद्वारावर वृद्धाने आत्मदहनाचा प्रयत्न केल्याचे समोर आले आहे. हा व्यक्ती नवी मुंबईचा असल्याची माहिती समोर आली आहे. पोलीस आणि प्रशासन सहकार्य करत नसल्याचे म्हणत या व्यक्तीने आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला, मात्र मंत्रालयातील सुरक्षा रक्षक आणि पोलीस यांनी वेळीच मध्यस्थी केल्याने मोठा अनर्थ टळला आहे. या घटनेबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

**वृद्ध व्यक्तीचा आत्मदहनाचा प्रयत्न**

समोर आलेल्या माहितीनुसार, या वृद्ध व्यक्तीने नवी मुंबई महापालिका आणि पोलीसांविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. पालीका आणि पोलिस मदत करत नाहीत असा आरोप करत या व्यक्तीने आत्मदहनाचा प्रयत्न केला. या व्यक्तीने सोबत रॉकेल आणले होते, हा व्यक्ती अंगावर रॉकेल ओतून घेत असताना पोलीसांना त्याला थांबवले आणि हे कृत्य करण्यापासून रोखले. आता पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले असल्याची माहिती समोर आली आहे.



आत्मदहनाचा प्रयत्न करणारा हा व्यक्ती कोण होता? त्याच्या अडचणी नेमक्या काय होत्या? त्याला नवी मुंबई पालिका प्रशासन आणि पोलीसांनी नेमका काय त्रास दिला याबाबत कोणतीही माहिती समोर आलेली नाही. तसेच या व्यक्तीच्या मागण्या काय होत्या हेही समजू शकलेले नाही. सध्या हा व्यक्ती पोलिसांच्या ताब्यात आहे. त्याची चौकशी सुरु असल्याची माहिती समोर आली आहे. चौकशीनंतर आत्मदहनाचे खरे कारण समोर येणार आहे. सध्या या प्रकरणाबाबत कोणतीही माहिती मिळू शकलेली नाही.

**याआधीही अनेकदा आत्महत्येचा प्रयत्न**

याआधीही अनेकांनी मंत्रालय परिसरात आत्मदहनाचा प्रयत्न केल्याचे समोर आले आहे. काही लोकांनी मंत्रालयात शिरून मंत्रालयाच्या इमारतीवरून खाली उडी मारून आत्महत्येचा प्रयत्न केल्याचे समोर आले आहे. याच कारणामुळे मंत्रालयात जाळी लावण्यात आलेली आहे. जरी एखाद्याने इमारतीवरून उडी घेतली तरी त्याला फारशी इजा होत नाही. वरून उडी घेतल्यानंतर व्यक्ती जाळीत अडकतो आणि त्यानंतर त्याला पोलीस आणि मंत्रालयातील सुरक्षा कर्मचारी सुखरूप बाहेर काढतात.

## मुस्लिम धर्मगुरुच नाव रोडवर लिहिल्याने अहिल्यानगरच्या कोटलामध्ये तणाव, पोलिसांचा लाठीचार्ज

■**अहिल्यानगर । प्रतिनिधी,**

अहिल्यानगरच्या कोटला गावात तणाव निर्माण झाला आहे. अहिल्यानगर-संभाजी नगर रोडवरील कोटला गावात जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांना लाठीचार्ज करावा लागला. अज्ञाताने मुस्लिम धर्मगुरुच नाव रोडवर लिहून विटंबना केली. त्यातून हा सर्व वाद निर्माण झाला. मुस्लिम धर्मीयांच्या भावना दुखावल्यामुळे ते रस्त्यावर उतरले. यावेळी रास्ता रोकोचा प्रयत्न झाला. अहिल्यानगरच्या कोटलामध्ये मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

अहिल्यानगरच्या कोटला गावात तणाव प्रकरणी पोलिसांनी तत्परतेने एकाला ताब्यात घेतलं आहे.रास्ता रोको सुरु झालेला. महामार्ग बंद केलेला. वाहनांच्या लांबच लांब रागा लागलेल्या. तणाव निर्माण झाल्याने पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला. कोतवाली पोलीस स्टेशनच्या हद्दीत हा प्रकार घडला. मुस्लिम धर्मीयांच्या भावना दुखावल्यामुळे मोचार्ला सुरुवात झालेली.



पोलिसांकडून येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांना त्रास होणार नाही, याची काळजी घ्या असं आवाहन करण्यात येत होतं. कायदा-सुव्यवस्था बिघडेल असं वागू नका, शांततेत निघून जा. तुम्ही आमच्या आवाहनाला प्रतिसाद दिला नाही, तर पोलीस योग्य पावल उचलतील अशी माईकवरुन घोषणा केली जात होती.

"अहिल्यानगरमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून शिवप्रतिष्ठान अनुष्ठानच्यावतीने दुगार्माता दौडच आयोजन केलं जातं. वेगवेगळ्या भागात ही दौड होते. या प्रकरणी एफआयआर दाखल झाला आहे. सकाळच्यावेळी घटना घडली, एका व्यक्तीला ताब्यात घेतलं आहे. विनाकारण रास्ता रोको करण्याला अर्थ नाही. आरोपी पोलिसांच्या ताब्यात नसताना, मागणी केली असती तर समजू शकतो. पोलिसांवर हल्ला करण्यात आल्याची सुद्धा माहिती आहे" असं आमदार संग्राम जगताप म्हणाले. "पोलीस दाखल झालेले आहेत. कायदा कोणी हातात घेऊ नये. लोकशाही मागार्ने संविधानानुसार जे काही आहे ते होईल" असं संग्राम जगताप म्हणाले. "रास्ता रोको चालू होता. जे समाजकंटक आहेत, त्यांनी शांततेचा भंग करण्याचा प्रयत्न केला. कोणी अफवांवर विश्वास ठेऊ नये" असं पोलीस अधिकाऱ्याने सांगितलं.



संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# अर्थव्यवस्थेची दमदार वाटचाल आणि स्वदेशीचा जागर



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय अर्थव्यवस्था दमदार वाटचाल करत असून, जीएसटी दर कपातीसह 'स्वदेशीचा जागर' देशभर गाजतो आहे. ट्रम्प प्रशासनाच्या दबावाला ठामपणे उत्तर देत मोदी सरकारने कर कपात, स्वदेशी आणि आत्मनिर्भर भारताचा ध्यास घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरून केलेल्या भाषणात वस्तू आणि सेवाकराच्या (जीएसटी) दरामध्ये मोठी कपात होणार असल्याचे जाहीर केले होते. त्यानुसार जीएसटी दरांमधील कपात २२ सप्टेंबरपासून लागू झाली आहे. याच दरम्यान, 'गर्व से कहो ये स्वदेशी है' हे अभियानही देशभर मोठ्या उत्साहात सुरू झाले आहे. अमेरिकेने भारतीय वस्तूंवरील वाढलेल्या आयात शुल्क, एच-१ बी व्हिसा शुल्कातील वाढ अशा निर्णयातून मोदी सरकारवर दबाव आणण्याचे प्रयत्न सुरू केल्याच्या पार्श्वभूमीवर जीएसटी दर कपातीचा निर्णय अंमलात आला. दर कपातीच्या या निर्णयाला पूरक असा स्वदेशीचा जागरही सुरू झाला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काही दिवसांपूर्वी भारतीय अर्थव्यवस्था मृत झाल्याचे वक्तव्य करून आपली मानसिकता दाखवून दिली होती. भारतीय कृषी क्षेत्र अमेरिकेच्या शेतमालासाठी पूर्णपणे खुले करण्याची मागणी ट्रम्प प्रशासनाकडून करण्यात आली होती. ही मागणी शांतपणे फेटाळून लावत मोदी सरकारने ट्रम्प प्रशासनाच्या दबावतंत्राला कोणत्याही परिस्थितीत भीक घातली जाणार नाही, असे स्पष्ट केले. ट्रम्प प्रशासनाने भारताबद्दल अवमानजनक भाषा वापरूनही त्याला त्याच भाषेत प्रत्युत्तर देण्याऐवजी मोदी सरकारने ठाम कृतीने उत्तर दिले. अमेरिकेने भारतीय वस्तूंवरील आयात शुल्क दुप्पट केल्यामुळे भारताच्या निर्यातीवर मोठा परिणाम होणार, अशी भीती देशातील अनेक स्वयंघोषित अर्थतज्ज्ञांनी दाखविली होती. अमेरिकेचे दबावतंत्र एकीकडे कठोर होत असताना मोदी सरकारने वस्तू आणि सेवाकरात मोठा फेरबदल केला. वस्तू आणि सेवाकराचे पाच आणि १८ टक्के असे दोनच टप्पे राहतील, असे जाहीर करत मोदी सरकारने देशाच्या अर्थव्यवस्थेच्या इतिहासातील क्रांतिकारी ठरणाऱ्या निर्णयाची अंमलबजावणी सुरू केली. कार, दुचाक्या, ट्रॅक्टर, टिलरसारखी शेतीची अवजारे, खते यांसारख्या वस्तूंवरील जीएसटीवर मोठी कपात केल्यामुळे सर्वसामान्य भारतीय जनतेला मोठा दिलासा मिळाला आहे. जीएसटीमध्ये मोठी कपात केल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आणखी एक आनंदाची बातमी दिली आहे. आज देश जीएसटी बचत उत्सव साजरा करत आहे. मी तुम्हाला सांगू इच्छितो की, आम्ही इथेच थांबणार नाही, असे म्हणत मोदी यांनी भविष्यात वस्तू व सेवा करात आणखी कपात होण्याचेही संकेत दिले आहेत. जीएसटी दर कपातीची अंमलबजावणी सुरू झाल्यावर पहिल्याच दिवशी म्हणजे २२ सप्टेंबर रोजी चारचाकीच्या बाजारात विक्रीच्या नवनव्या विक्रमांची नोंद झाली. मारुती सुझुकीच्या ३० हजार गाड्या २२ सप्टेंबर रोजी विकल्या गेल्या. ह्युंदाईच्या ११ हजार, तर टाटा मोटर्सच्या १० हजार गाड्यांची विक्री एकाच दिवसात झाली. जीएसटी दर कपातीची अंमलबजावणी सुरू झाली असतानाच दुसरीकडे भारतात बनवलेल्या आयफोन-१७ची विक्री १९ सप्टेंबर रोजी सुरू झाली. हा फोन खरेदी करण्यासाठी ग्राहकांच्या मोठ्या रांगा लागल्याचे दृश्य मुंबईसह अनेक शहरांमध्ये दिसले. ज्या अर्थव्यवस्थेची ट्रम्प प्रशासनाने हेटाळणी केली त्याच भारतात आयफोन-१७ सारख्या महागड्या फोनची खरेदी करण्यासाठी रांगा लागत आहेत. हे चित्र कार आणि महागड्या मोबाईलच्या विक्रीपुरते मर्यादित नाही. यातून भारतातील सर्वसामान्य नागरिकांच्या वाढत्या खरेदी शक्तीचे आणि दमदार अर्थव्यवस्थेचे दर्शन संपूर्ण जगाला घडले. मोदी सरकारने आत्मनिर्भर भारत संकल्पना प्रत्यक्षात आणण्याच्या निधार्रने ह्यहर घर स्वदेशी, घर घर स्वदेशीह्न या अभियानाचा जागर सुरू केला आहे. भारतीय नागरिकांनी भारतात बनवलेल्या वस्तू खरेदी कराव्यात, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी गेल्या काही दिवसांपासून सातत्याने करीत आहेत. भारतीय उत्पादकांनी, कारागिरांनी बनविलेल्या वस्तू खरेदी केल्यास भारतीय अर्थव्यवस्थेला मोठे बळ मिळेल. विदेशात बनविलेल्या अनेक वस्तू, उत्पादने सर्वसामान्य भारतीयांच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहेत. ही परिस्थिती बदलण्यासाठी देशातील उत्पादकांनी, स्थानिक कारागिरांनी बनविलेल्या वस्तू आग्रहाने वापरणे सुरू केल्यास देशाचे सकल राष्ट्रीय उत्पादन लक्षणीय प्रमाणात वाढू शकेल. मोदी सरकारने याच उद्देशाने गेल्या ११ वर्षांत देशांतर्गत उत्पादन वाढविण्यावर भर दिला आहे. महात्मा गांधींनी पुरस्कार केलेली खादी काँग्रेसच्या अनेक वर्षांच्या सत्ताकाळात दुर्लक्षित राहिली होती. मोदी सरकारने वेगवेगळ्या मागार्ने खादीची विक्री वाढावी यासाठी निधार्रने प्रयत्न केले. या प्रयत्नांना चांगले यश मिळाल्याचे दिसून येत आहे. २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात खादी आणि ग्रामोद्योगाने एक लाख ७० हजार कोटी एवढा विक्रमी व्यवसाय केला. खादी कपड्यांची तडाखेबंद विक्री होत आहे. लघु आणि कुटीर उद्योगावर मोदी सरकारचा विशेष भर आहे. आत्मनिर्भर भारताचे आणि विकसित भारताचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी देशातील लघु आणि कुटीर उद्योगाला महत्त्वपूर्ण भूमिका बजावावी लागणार आहे, या दृष्टीने मोदी सरकारने धोरणांची आखणी केली आहे. दूरदृष्टीने घेतलेल्या अनेक निर्णयांमुळे मोदी सरकारच्या गेल्या ११ वर्षांच्या काळात संरक्षण उत्पादनांची निर्यात होऊ लागली आहे. सेमी कंडक्टर चीपसाठी अन्य देशांवर अवलंबून असलेला भारत आता या चीपची निर्मिती करणार आहे. इंडिया सेमीकंडक्टर मिशनअंतर्गत १० सेमीकंडक्टर कारखान्यांना मंजुरी देण्यात आली आहे. मोदी सरकारच्या दूरदृष्टीच्या निर्णयांना यश मिळत आहे, हे भारताच्या विकास दरावरून ठळकपणे अधोरेखित होत आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने (आयएमएफ) २०२५-२०२६ या वर्षात भारताचा विकासदर ६.४ ते ६.५ टक्के एवढा राहील, असे अनुमान वर्तवले आहे. २०२५-२०२६ या आर्थिक वर्षातील पहिल्या तिमाहीत भारताचा विकासदर ७.८ टक्के होता. जगात सर्वाधिक वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून भारताकडे पाहिले जात आहे. शेजारी देशांमधील यादवी, सत्तापालट, रशिया-युक्रेन युद्ध, ट्रम्प प्रशासनाने सुरू केलेले दबावतंत्र अशा पटावर भारतीय अर्थव्यवस्था दमदार वाटचाल करत आहे. या वाटचालीला अपशकून करण्याचे प्रयत्न सातत्याने होत असतानाही भारतीय अर्थव्यवस्था मोठ्या दिमाखाने जगातील तिसऱ्या क्रमाकांची अर्थव्यवस्था बनण्याकडे वाटचाल करत आहे.

# निसर्ग आणि सत्ताधाऱ्यांच्या कोंडीत शेतकरी

**अतिवृष्टी व पुरामुळे शेतकरी उद्ध्वस्त झाला असून, सरकारच्या बेफिकिरीमुळे त्यांची स्थिती अधिकच बिकट झाली आहे. पिकं, पशुधन, घरं, धान्यांचं प्रचंड नुकसान होऊन शेतकरी आर्थिक, मानसिक संकटात सापडला आहे.**



जगाचा पोशिंदा, अन्नदाता शेतकरी आज प्रचंड मोठ्या संकटात आहे. अतिवृष्टी, पुराने त्याचा संसार उद्ध्वस्त केला आहे, तर दुसरीकडे सरकारच्या असंवेदनशील, बेफिकीर व मग्रूर वर्तनाने त्याच्या आशा-अपेक्षांचा चिखल झाला आहे. या दुहेरी संकटाने शेतकरी हताश, निराश झाला आहे. ज्या जनतेने महायुतीला प्रचंड बहुमत दिले. त्या महायुतीचे सरकार शेतकऱ्याला कणभरही द्यायला तयार नाही. सरकारचा राक्षसी बहुमताचा अहंकार कौरवाच्या अहंकारापेक्षा मोठा आहे हे यातून स्पष्ट होते.

### अर्ध्यापेक्षा जास्त महाराष्ट्र पुरात

राज्यातल्या ३६ जिल्हे व ३५८ तालुक्यांपैकी ३० जिल्हे व ३०० तालुके अतिवृष्टी व पुराने बाधित आहेत. १०० लाख हेक्टरवरील शेतीचे नुकसान झाले आहे. खरिपाची पिके, फळबागा उद्ध्वस्त झाल्या आहेत. सोयाबीन, कपाशी, मका, उडीद, मूग, कांदा, तूर, हळद, पिकांचा चिखल झाला आहे. १००हून अधिक नागरिकांचा मृत्यू झाला आहे. शेतकऱ्यांनी पोटच्या लेकराप्रमाणे सांभाळलेले पशुधन नष्ट झाले आहे. पिकासोबत राहते घर, छप्पर, गोठे, शेतीची औजारे, साठवलेला शेतमाल आणि अन्नधान्यांचे अपरिमित नुकसान झाले आहे. ही फक्त 'नैसर्गिक आपत्ती' नाही, तर शेतकऱ्यांवर आलेली सामाजिक- आर्थिक आपत्ती आहे.

### पंचनाम्याची पळवाट

मुख्यमंत्री म्हणतात, ओला दुष्काळ हा फक्त शब्द आहे, पंचनामे सुरू आहेत, ते झाल्यावर मदतीचे पाहू. धाराशिव, बीड, लातूर, सोलापूर या जिल्ह्यातील मांजरा, सिंदफणा, सिना या सर्व मोठ्या नद्यांना गेल्या एक महिन्याहून अधिक काळापासून पूर आलेला आहे. नदीकाठची शेकडो गावे पाण्यात आहेत. अनेक ठिकाणी या नद्यांची पात्र एक किलोमीटर रुंदीची झाली आहेत. या परिसरातील शेती, गावे, रस्ते, पूल सर्वकाही पाण्याखाली आहे. तिथे तलाठी जाणार कसा? आणि पंचनामा करणार कसा? मंत्र्यासारखे त्याला हेलिकॉप्टर थोडेच मिळणार आहे?

### ध्वजारोहणापुरते पालक

मराठवाड्यात ऑगस्ट महिन्यापासूनच पूरस्थिती आहे. पण सरकारला जाग यायला २५ सप्टेंबर उजाडला. ध्वजारोहण आणि त्याच दिवशी जिल्हा नियोजन समितीच्या बैठका घेऊन लगेच संध्याकाळी मुंबईला पळणाऱ्या पालकमंत्र्यांना तर आपापल्या जिल्ह्यातील अतिवृष्टी आणि पूरस्थितीचा आढावा घेण्यास, पाहणी करून शेतकऱ्यांना धीर देण्यास वेळच नाही. निधीवाटपाशिवाय त्यांचा पालक जिल्ह्याशी काही संबंध नाही. तीन पक्षांच्या युतीचे सरकार असल्याने मतभेद होऊ नयेत म्हणून दूरच्या जिल्ह्यातील मंत्र्यांना पालकमंत्री नेमण्याचा मुख्यमंत्र्यांचा तोडगा 'रोगापेक्षा इलाज भयंकर' असाच आहे.

### निवडणूक नाही, मदत नाही

नवी मुंबई विमानतळ मेट्रो आणि मुंबईत होणाऱ्या फिटनेक संमेलनाचे निमंत्रण पंतप्रधान नरेंद्र मोदींना देण्यासाठी मुख्यमंत्री नुकतेच दिल्लीला जाऊन आले. पूरग्रस्त भागातील नागरिक त्यांच्या या दिल्ली दौऱ्याकडे मोठी आशा लावून बसले होते. केंद्राकडून काही तरी मदत मिळेल अशी भाबडी आशा त्याला होती. पण मुख्यमंत्र्यांनी दिल्लीत पत्रकारांशी बोलताना गडचिरोली जिल्ह्यातील खाण आणि लोहखनिज उद्योग याबाबत महत्त्वाची चर्चा झाल्याचे जोर देऊन सांगितले. यावरून त्यांची प्राथमिकता शेतकरी नाही तर गडचिरोलीचे खाण आणि स्टील उद्योग आहे हे दिसते. लोकलाजेखातर मुख्यमंत्री, मंत्र्यांनी पूरग्रस्त भागाचे दौरे केले, पण केंद्र सरकारने पूर्णपणे दुर्लक्ष केले. केंद्रातील एकाही मंत्र्याने पाहणी केली नाही. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा मुंबईत येऊन गेले, पण त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर एक शब्दही उच्चारला नाही. त्यांचे हे मौन केवळ राजकीय बेफिकिरी नव्हे तर शेतकऱ्यांचा आणि महाराष्ट्रातील जनतेचा अपमान आहे.

### असंवेदनशील वक्तव्यांची मालिका

संकटाच्या या काळात उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम सत्ताधाऱ्यांच्या वक्तव्यांनी केलेले आहे. मुख्यमंत्री मदतीबाबत विचारणाऱ्या शेतकऱ्याला राजकारण करू नका म्हणून दरडावतात. अर्थमंत्री अजित पवार म्हणतात, पैशाचं सोंग आणता येत नाही. जलसंपदा मंत्री गिरीष महाजन म्हणतात, आम्ही पैसे घेऊन फिरत नाही. निवडणुकीच्या काळात कर्जमाफीचे आश्वासन देताना यांना आर्थिक स्थितीची माहिती नव्हती का? तेव्हा त्यांनी कोणते सोंग केले होते? सरकारच्या या फसवणुकीमुळे हताश आणि निराश झालेला शेतकरी आत्महत्या करण्याच्या उंबरठ्यावर पोहोचला आहे; याचेही भान सत्ताधाऱ्यांना राहिलेले नाही.

### फोटोसेशनचे राजकारण

पूरग्रस्त भागाची पाहणी करण्यासाठी नेते येतात, पण त्यांच्या मनात शेतकऱ्यांबद्दल आत्मियता नाही. ते हेलिकॉप्टर किंवा महागड्या गाडीतून उतरतात, डांबरी रस्त्याच्या कडेला उभे राहतात, महागड्या बुटांना चिखल लागू नये म्हणून रस्त्यावरूनच शेत पाहतात, फोटो व्हिडीओ काढून माध्यमांना पाठवतात. राज्य सरकारमधील काही तर अशा 'चमकोगिरी'साठी प्रसिद्ध आहेत. पण यावेळी संतप्त शेतकऱ्यांनी मंत्री गिरीष महाजन यांना अक्षरशः हाकलून लावले. हा राग केवळ महाजन या एका व्यक्तीविरुद्ध नसून या प्रवृत्ती आणि सत्ताव्यवस्थेविरुद्ध आहे.

### निकषांचा खेळ

सरकारने मदतीचे निकष बदलून शेतकऱ्यांची स्पष्ट फसवणूक केली आहे. मार्च २०२३ मध्ये जिरायतासाठी हेक्टरी ८,५०० रुपये आणि बागायतीसाठी १७,००० रुपये २ हेक्टर मर्यादेपर्यंत निश्चित करण्यात आले होते. निवडणुकीच्या तोंडावर जानेवारी २०२४ मध्ये या निकषांमध्ये बदल करून जिरायतासाठी १३,६०० रुपये, बागायतीसाठी २७,००० रुपये देण्यासह कमाल ३ हेक्टरपर्यंत मदत देण्याचा निर्णय घेतला गेला. मात्र मे २०२५ मध्ये देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली हा निर्णय मागे घेण्यात आला आणि मार्च २०२३ चे जुने निकष पुन्हा लागू केले गेले. परिणामी शेतकऱ्यांना हेक्टरीला फक्त ८,५०० रुपये मिळणार आहेत.

एक एकर सोयाबीन पिकासाठी साधारण २५,००० रुपये खर्च येतो; म्हणजे अडीच एकरावर अंदाजे ६२,५०० रुपये खर्च येतो, तर सरकार फक्त ८,५०० रुपयेच भरपाई देत आहे. शेतकऱ्याला तब्बल ५४,००० रुपयांचा तोटा सहन करावा लागतो. हा तोटा शेतकऱ्यांना आर्थिक आणि मानसिक संकटात ढकलणारा आहे. एक पीक हातातून गेले की, वर्षभर शेतकरी कर्जाच्या जाळ्यात अडकतो. मुलांच्या शिक्षण, घरगुती खर्च, दवाखाना यासाठी त्याला कर्ज घ्यावे लागते आणि तो कर्जाच्या दुष्टचक्रात अडकतो आणि आत्महत्या करतो.

निसर्गाच्या कोपाला शेतकरी काही करू शकत नाही. पण सरकारच्या बेफिकिरीमुळे त्याची स्थिती अजून बिकट झाली आहे. सरकारी मदतीसाठी निवडणुकीची वाट पहावी लागते, हे न्यू इंडियातील कटू सत्य आहे. बिहारमध्ये कोणतीही आपत्ती नाही. पण निवडणूक आहे म्हणून तिथल्या ७५ लाख महिलांना सरकार प्रत्येकी १० हजार रुपये देणार आहे. महाराष्ट्रात निवडणूक नाही म्हणून पूरग्रस्तांना मदत नाही. सरकारकडे राजकीय स्वार्थासाठी पैसा आहे, संकटग्रस्त शेतकऱ्यांसाठी नाही. शेतकरी हा महाराष्ट्राचा कणा आहे. त्यालाच मोडणारे हे सरकार केवळ शेतकरीविरोधी नव्हे तर समाजविरोधी महाराष्ट्रद्रोही आहे. सरकारने कर्जमाफीसह निवडणुकीत दिलेली आश्वासने पाळली नाहीत. त्यामुळेच अगोदरच संतप्त असलेल्या शेतकऱ्यांच्या डोळ्यांतला राग दिवसेंदिवस वाढतो आहे. हा राग लवकरच राजकीय वणव्यात बदलेल आणि त्यात या जुमलेबाज, खोटारड्या सरकारचा मुखवटा जळून खाक झाल्याशिवाय राहणार नाही.

# पाण्यासाठी अजूनही छद्म विज्ञान व भोंदूगिरीचा आधार

**मानवी जीवनातील पाण्याचे महत्त्व निर्विवाद असले, तरी पाण्याचा शोध घेण्यासाठी काही जण अजूनही छद्म विज्ञान व भोंदूगिरीचा आधार घेत आहेत. नारळ, धातूच्या सळया वापरून पाणी शोधल्याचे दावे केले जातात. पण या पद्धतींमागे शास्त्रीय आधार नसून केवळ हातचलाखीचा खेळ असतो.**



माणसाच्या मूलभूत गरजा पैकी पाणी ही अगदी वरच्या क्रमांकाची गरज आहे. मानवी वस्तीचा इतिहास सांगतो की, बाराही महिने पाणी उपलब्ध असलेल्या ठिकाणीच मानवाने वस्ती केली. भटके भटकंतीमध्ये पाण्याच्या ठिकाणीच मुक्काम करत स्थिरावू लागले. पशुपालन, शेती होऊ लागली. औद्योगीकरणाला सुरुवात झाली, वसाहतींचा विस्तार झाला. पशुपालनाचे, शेतीचे व्यवसायकरण झाल. शेतीचं पाणी कारखान्यांकडे वळवलं गेलं. औद्योगिकीकरण प्रचंड वाढल, त्या प्रमाणात पाण्याचा वापरही वाढला. शहराचे सांडपाणी, कारखान्याचे रसायन मिश्रीत पाणी कोणत्याही प्रक्रिये विना नदी-नाल्यात जाऊ लागले, जात आहे. त्यामुळे नद्यांचे आहे ते पाणी वापरण्यायोग्य राहिले नाही. वरचेवर वाढत असलेल्या तापमानामुळे पाण्याचे बाष्पीभवन होत आहे. पाण्याचे स्त्रोत मात्र पूर्वी होते तेच आहेत. उलट हळूहळू ते कमी होऊ लागले आहेत. तलाव आटू लागलेत आणि वाहत्या नद्यांचे डबके होत आहेत. जमिनीवरील पाण्याच्या स्त्रोतांची अशी अवस्था होत असल्यामुळे पाणी टंचाई निर्माण होत आहे. टंचाई दूर करण्यासाठी आपण भूगभार्तील पाण्याकडे वळलो, पण त्याचा शोध घेण्यासाठी आधार घेत आहोत छद्म विज्ञानाचा.

बागायती शेतीला आणि बांधकामाला खूप पाणी लागते. शेतकऱ्यांला जलसंपदा विभागावर व प्लॉट धारकाला स्थानिक पाणीपुरवठा संस्थांवर विसंबून राहणं परवडत नाही. त्यामुळे ते बोअरवेल हा (विंधन विहीर) पर्याय निवडतात. पण बोर नेमका घ्यायचा कुठे? ... आता हा प्रश्न चिंतेचा राहिला नाही. या आधुनिक काळात घर बांधून देणाऱ्या काही आर्किटेक, इंजीनियर, कॉन्ट्रॅक्टर यांच्याकडे वास्तुशास्त्रींची यादी असते तसी पाणाड्यांचीही असते. त्यातून कोणताही पाणाडी निवडा चॉईस तुमची, असं ते सुचवितात.

भूगभार्तील पाणी (तेल, खनिजे) शोधण्याच्या तंत्राला 'डाऊझिंग' व पाणी शोधणाऱ्या व्यक्तीला 'डाऊझर' म्हणतात.आपल्याकडे काही पायाळू किंवा अलौकिक शक्ती असणारे (जमिनी खालील धन दाखवणारे असतात तसे) व्यक्ती हे काम करतात. हा उघड बुवाबाजीचा प्रकार आहे. सध्या यांना मागणी नाही. भौतिक वस्तूच्या सहाय्याने पाणी शोधण्याच्या पद्धतीत नारळ व धातूंच्या सळया वापरणाऱ्यांची चलती आहे. या सळ्यांना 'डाऊझिंग रॉड' म्हणतात. सध्याच्या मार्केटमध्ये लोकप्रिय असलेल्या या दोन पद्धतींची कार्यप्रणाली बघू.

नारळाच्या मदतीने पाणी शोधण्यासाठी पाणी असलेला नारळ वापरतात. ज्या प्लॉटमध्ये किंवा शेतामध्ये पाण्याचा शोध घ्यायचा आहे तेथे त्या नारळची पूजा मांडतात. पूजेनंतर नारळाच्या डोळ्याच्या भागाकडे काही जटा (शेंडी) ठेवून त्याला पूर्ण सोलून घेतात. पाणाडी आपला उजवा तळहात आकाशाकडे व जमिनीला समांतर असा धरतो. शेंडी बोटाच्या दिशेने असेल अशा पद्धतीने तो नारळ तळहातावर ठेवतो आणि प्लॉट/शेतामध्ये पाण्याचा शोध घेत फिरतो. ज्या ठिकाणी नारळ उभा राहिला (जमिनीला समांतर असलेली शेंडी काटकोनात येते) त्या ठिकाणी जमिनीखाली पाणी आहे असं सांगतो.

'डाऊझिंग रॉड' पद्धतीमध्ये सहा मी. मी. व्यासाचे, इंग्रजी 'एल' अकराचे तांब्याचे रॉड वापरतात. यांची मुठीत धरण्याची बाजू सहा इंच व दुसरी बाजू १८ ते २४ इंच लांबची असते. पाणाडी हे दोन रॉड आपल्या दोन्ही मुठीत छातीजवळ, जमिनीला व एकमेकांना समांतर स्थितीत धरतात आणि प्लॉटमध्ये किंवा शेतात पाणी शोधत फिरतात. मुठीत धरलेल्या भागाच्या असाभोवती रॉड गोल फिरू शकतात. ज्या ठिकाणी हे रॉड गोल फिरत एकमेकांना छेदतील त्या ठिकाणी जमिनीखाली पाणी आहे असे सांगतात.

या शिवाय झाडाची फांदी, ओळंबा, अंड, बोळक, वारलं, घाडग, माठ, चलनी नान, या वस्तूंचा देखील वापर होतो. या सर्व पद्धतीचे तत्व एकच आहे. ज्या ठिकाणी वस्तू हलते तिथे जमिनीखाली पाणी असते.

प्रत्येक पाणाडी आपण वापरत असलेली पद्धत योग्य आहे व आपलेच रिझल्ट इतर पद्धतीपेक्षा चांगले असल्याचे सांगतात. काही पाणाडी तर आपण आत्तापर्यंत दाखवलेल्या सर्वच ठिकाणी पाणी लागल्याचा दावा करतात. म्हणजे यशाची १०० टक्के गॅरंटी. आपण दाखवलेल्या पॉईंटला भरपूर पाणी लागल्याचा पुरावा म्हणून कोणत्यातरी ठिकाणचे मशीन बोअर ड्रिलिंग करत असताना निघत असलेल्या पाण्याच्या फवाऱ्याचे फोटो दाखवतात.

पाणी शोधण्याची प्रक्रिया चालू असताना तिथे उपस्थित असलेल्या पैकी कोणी हा प्रयोग करायची इच्छा व्यक्त केली, तर त्याला स्वतःची साधन वापरू देत नाहीत. यासाठी ते कारण देतात त्याची व तुमची जन्मरास, नक्षत्र, तिथी वेगळी आहे. त्यामुळे ती साधन तुम्हाला योग्य प्रतिसाद देणार नाहीत. पाणाड्याने एकदा पाण्याचा पॉईंट दाखवल्यावर त्या ठिकाणी खून करून ठेवली व डोळे बांधून तीच कृती पुन्हा-पुन्हा करण्यास सांगितल्यास पाणाडी तयार होत नाहीत. अनेक पाणाड्यांनी एकाच प्लॉटमध्ये व शेतात वेगवेगळ्या पाणी असल्याचे पॉईंट दाखवले आहेत. जमिनीखाली पाणी शोधण्याची ही पद्धत खरोखरच शास्त्रीय पद्धत असेल, तर त्याची प्रचिती वारंवार व कोणाच्याही हस्ते यायला पाहिजे. परंतु तसे होत नाही. पाणाड्यामध्ये एक समान बाब दिसते ती अशी की, त्यांनी दाखविलेला पॉईंट प्लॉटच्या किंवा शेताच्या मध्यभागी नसतो. एवढी काळजी घ्यावीच लागते, ग्राहक दुसऱ्या दुकानावर जाऊ नये याची खबरदारी म्हणून...

पाणाड्यांनी पॉईंट दाखवलेल्या ठिकाणी हीच साधन इतर वस्तूंच्या आधारे धरली/ठेवली तर हलणार नाहीत. परंतु पाणाड्याच्या हातात असल्यावर हलतात. याचे कारण न्युटन दादाने सांगून ठेवले आहे, जोपर्यंत बाह्यबलाचा वापर होत नाही तोपर्यंत स्थिर वस्तू हलणार नाही. इथे याची प्रचिती येते. पाणाडी हा नारळ तळव्याच्या व बोटांच्या मधील उंचवट्यावर ठेवतो. तळव्याची किंवा बोटांची खाली वर किंवा तिरपी हालचाल न करता (लोकांचे लक्ष इकडे असते), नकळत हात सरळ रेषेत अगदी थोडा मागे पुढे केला की क्षणात नारळ तळव्याच्या उंच भागावरून खोलगट भागात येतो. नारळात असलेल्या पाण्याच्या हेलकाव्यामुळे ही प्रक्रिया जलद गतीने घडते. तळ हाताला समांतर असलेली नारळाची शेंडी काटकोनामध्ये उभी राहते. खरंतर ही शेंडी जागेची खून म्हणून ठेवली असते. पण ती लक्ष वेधून घेते व नारळ फिरला हे दर्शवते.

डाऊझिंग रॉडचीही हालचाल याच पद्धतीची असते. रॉडच पुढचे टोक थोडे उचलले की, रॉड पाहिजे त्या दिशेला फिरवता येतात. ही कृती करताना लोकांचं लक्ष मनगट व मुंठीकडे असतं. पण पाणाडी डाऊझिंग रॉडचे पुढचे टोक खाली-वर करण्यासाठी खांद्याची हालचाल करतो. खांद्यापासून मोठीपर्यंत व तेथून रोडच्या टोकापर्यंत हे अंतर बरेच असल्यामुळे खांद्याच्या थोड्याशा हालचालींची मोठा परिणाम साधता येतो.

खरंतर अनेक पाणाड्यांना पाण्याचे, भूगर्भ रचनेचे आणि संबंधित इतर बाबींचा प्राथमिक ज्ञान सुद्धा नसते. परंतु त्यासंबंधीच्या संज्ञा मात्र अधिकारवाणीने वापरतात. जसे इथे तीन इंची पाणी लागेल, पाच इंची लागेल, चार एच.पी.ची, पाच एच. पी ची मोटर २४ तास चालेल, वीस तास चालेल. तसेच तीन इंची पाणी म्हणजे किती? किंवा किती एच.पी. ची मोटर किती लिटर पाणी किती उंचीवर पोहचवेल याच उत्तर त्यांच्याकडे नसते. त्यांनी सांगितलेल्या ठिकाणी बोर ड्राय का गेला याचे उत्तर मात्र त्यांच्याकडे असते. ते असे, आम्ही सांगितलेला पॉईंट बरोबर होता. बोअर मारताना मशीनवाल्यांने दोन फूट बाजूला मारला किंवा आम्ही सगळे व्यवस्थित केले, पण तुमच्याच नशिबात पाणी नाही त्याला आम्ही काय करणार?

नारळ किंवा डाऊझिंग रॉड व्यवस्थित हाताळू शकणारी व्यक्ती नदीत/समुद्रात बोटीवर हा प्रयोग करून त्या ठिकाणी खाली पाणी नसल्याचे संकेत देऊ शकतो किंवा फ्लाय ओव्हरवर, २५ माळ्याच्या बिल्डिंगच्या टेरेसवर किंवा १० कि.मी. उंचीवरून आकाशात ९०० कि.मी. प्रती तास वेगाने पुढे सरकणाऱ्या विमानात ही कृती करून खाली भरपूर पाणी असल्याचे संकेत देऊ शकतो.



# महाराष्ट्रातील देवीची ९ प्रसिद्ध मंदिरे



भारतीय उपखंडात एकूण ५१ शक्तीपीठे आहेत आणि महाराष्ट्रात साडेतीन शक्तीपीठे, सप्तशृंगी, माहूरगड, तुळजा भवानी आणि कोल्हापूर महालक्ष्मी येथे आहेत. महाराष्ट्रात भद्रकाली मंदिर नाशिक, भवानी माता मंदिर प्रतापगड, श्री जोगेश्वरी देवी मंदिर आणि कोराडी मंदिर नागपूर अशी अनेक प्रसिद्ध देवी मंदिरे आहेत.

- **सप्तशृंगी देवी मंदिर, नाशिक –** सप्तशृंगी देवी मंदिर नाशिकपासून ६० किमी अंतरावर आहे आणि भारतातील सर्वाधिक भेट दिलेल्या धार्मिक स्थळांपैकी एक आहे. हे मंदिर महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठांपैकी एक म्हणून प्रसिद्ध आहे.
- **मुंबा देवी मंदिर, मुंबई –** मुंबईतील मुंबा देवी मंदिर हे शहरातील लोकप्रिय पर्यटन स्थळांपैकी एक आहे. हे मंदिर शहराच्या संरक्षक देवी मुंबाला समर्पित आहे, दुर्गा देवीचा हा स्थानिक अवतार मानला जातो.
- **एकवीरा देवी मंदिर, लोणावळा –** एकविरा आई मंदिर लोणावळ्याजवळ कार्ला लेणीजवळ आहे, आगरी-कोळी लोक मातेची पूजा करतात. हे मंदिर एका टेकडीच्या माथ्यावर सुमारे ५०० पायऱ्या असलेले आणि कार्ला लेण्यांनी वेढलेले आहे.
- **रेणुका देवी मंदिर, माहूर –** माहूर हे रेणुका देवी मंदिरासाठी प्रसिद्ध आहे, हे महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठांपैकी एक शक्तीपीठ आहे. माहूरमध्ये अनुसया मंदिर आणि कालिका मंदिरासारखी इतर अनेक मंदिरे आहेत.
- **तुळजाभवानी मंदिर, सोलापूर –** तुळजा भवानी मंदिर हे एक प्रसिद्ध तीर्थक्षेत्र आहे, ते सोलापूरपासून ४५ किमी अंतरावर आहे आणि ५१ शक्तीपीठांपैकी एक मानले जाते. तुळजापूरमधील भवानी मंदिर सह्याद्रीच्या पर्वतरांगांच्या उतारावर यमुनाचल नावाच्या टेकडीवर आहे.
- **महालक्ष्मी मंदिर, कोल्हापूर –** कोल्हापूरच्या महालक्ष्मी मंदिराला दक्षिण काशी असेही म्हणतात आणि ते भारतातील ५१ शक्तीपीठांपैकी एक आहे. कोल्हापूरचे मंदिर श्री पीठम म्हणून देखील पूजनीय आहे. येथील समृद्धीची देवता महालक्ष्मी देवीला अंबाबाई देखील म्हणतात.
- **चतुःशृंगी मंदिर, पुणे –** सेनापती बापट रोडवरील टेकडीच्या उतारावर असलेले चतुःशृंगी मंदिर हे पुणे शहरातील प्रसिद्ध मंदिरांपैकी एक आहे. ९० फूट उंच आणि १२५ फूट रुंद असलेले चतुःशृंगी मंदिर शक्ती आणि श्रद्धेचे प्रतीक आहे.
- **वज्रेश्वरी मंदिर, मुंबई –** वज्रेश्वरी योगिनी देवी मंदिर मुंबईपासून ७५ किमी अंतरावर आहे, ते वज्रेश्वरी देवीला समर्पित आहे. मंदिरात नवरात्रोत्सव साजरा केला जातो, हिंदू देवींच्या उपासनेसाठी नवरात्र उत्सव आणि देवीच्या सन्मानार्थ मोठी जत्रा भरते.
- **मंधारदेवी काळूबाई मंदिर, सातारा –** सातारा जिल्ह्यातील वाई भागात 4,650 फूट उंच डोंगरावर मंधारदेवी काळूबाई मंदिर आहे. हे मंदिर लोकप्रिय आहे आणि दरवर्षी जानेवारी महिन्यात काळूबाई जत्रा यात्रा भरते.

## दुर्गा मातेच्या ९ रूपांशी जोडलेले खास मंदिरे

शारदीय नवरात्रीत दुर्गा मातेच्या नऊ रूपांची पूजा केली जाते. हे माता पार्वतीचेच नऊ रूप आहे. या नऊ रूपांचे देशभरात अनेक मंदिरे आहे. पण काही खास ठिकाणचे मंदिरे हे प्रमुख मंदिर आहे जिथे माता दुर्गाचे नऊ रूप पूजले जातात. तर चला पाहूया दुर्गा मातेच्या नऊ रूपांचे नऊ प्रमुख मंदिरे कुठे कुठे आहे.

- **शैलपुत्री मंदिर काशी –** दुर्गा मातेचे प्रथम रूप आहे शैलपुत्री, तसेच शैलपुत्री देवीचे मंदिर हे काशी घाटावर स्थित आहे. माता शैलपूत्रीचे हे मंदिर अतिशय प्राचीन आहे. शैल अर्थात हिम पर्वत, हिमालयाची मुलगी असल्याकारणारे दुर्गा मातेच्या पहिल्या रुपाला शैलपुत्री असे म्हणतात. असे मानले जाते की, जन्म झाल्यानंतर माता पहिल्यांदा इथे आली होती व इथेच विराजमान झाली.
- **ब्रम्हचारिणी मंदिर वाराणसी –** दुर्गा देवीचे दुसरे रूप आहे ब्रम्हचारिणी, तसेच ब्रम्हचारिणी देवीचे मंदिर हे वाराणसी मधील बालाजी घाटावर स्थित आहे. ब्रम्हचारिणी अर्थात तपाची चारिणी म्हणजे तपाचे आचरण करणारी देवी. असे मानले जाते की, ब्रम्हचारिणी अर्थात जेव्हा त्यांनी तपश्चर्या करून शिवाला प्राप्त होते.
- **चंद्रघंटा मंदिर प्रयागराज –** दुर्गा देवीचे तिसरे रूप आहे चंद्रघंटा, तसेच चंद्रघंटा देवीचे मंदिर हे प्रयागराज मध्ये स्थित आहे. माता पार्वतीचे चंद्रघंटा रूप आहे ज्यांना चंद्रमोळी शिवाजी पती रूपात प्राप्त झाले. चंद्रघंटा अर्थात ज्यांच्या मस्तकावर अर्धचंद्र स्थित आहे.
- **कुष्मांडा मंदिर कानपूर –** दुर्गा देवीचे चौथे रूप आहे कुष्मांडा. तसेच हे कुष्मांडा देवीचे मंदिर हे कानपूर मधील घाटमपूर ब्लॉक मध्ये स्थित आहे. आपल्या उदरामध्ये संपूर्ण ब्रम्हाण्डला सामावून घेणारी देवी म्हणून कुष्मांडा ओळखली जाते.
- स्कंदमाता मंदिर वाराणसी- दुर्गा मातेचे पाचवे रूप आहे स्कंदमाता, तसेच स्कंदमाता देवीचे मंदिर हे हिमाचल मधील खनाल मध्ये स्थित आहे. कार्तिकेय अर्थात स्कंदची माता असल्याकारणारे दुगार्मातेच्या या रुपाला स्कंदमाता म्हणतात.
- **कात्यायनी मंदिर एवेर्सा –** दुर्गा मातेचे सहावे रूप आहे कात्यायनी, तसेच कात्यायनी देवीचे मंदिर कर्नाटक मधील अंकोला जवळ एवेर्सा मध्ये कात्यायनी बाणेश्वरी मंदिर म्हणून प्रसिद्ध आहे. ऋषी कात्यायन यांची मुलगी असल्यामुळे देवीच्या या रुपाला कात्यायनी म्हणतात. वृंदावन, मथुरा, भूतेश्वर मध्ये स्थित असलेले कात्यायनी वृंदावन हे शक्तीपीठ जिथे माता सतीचे केशपाश पडले होते.
- **कालरात्री मंदिर वाराणसी –** दुर्गा मातेचे सातवे रूप आहे कालरात्री, तसेच कालरात्री देवीचे मंदिर हे वाराणसी मध्ये स्थित आहे. कालरात्री अर्थात संकटांचा नाश करणारी. माता माता कालरात्रीने राक्षसांचा वध केला म्हणून दुगार्मातेच्या या रूपाची पूजा रात्री केली जाते.
- **महागौरी मंदिर लुधियाना –** दुगार्मातेचे आठवे रूप आहे महागौरी, तसेच महागौरी या देवीचे मंदिर पंजाब मधील लुधियाना मध्ये स्थित आहे. गौर अर्थात श्वेत म्हणजे महागौरी म्हणून ओळखली जाते. असे म्हणतात की, पार्वती देवीचे शरीर तपामुळे काळे पडले होते यामुळे शिवाजींनी त्यांना गौर वर्ण प्रदान केला होता.
- **सिद्धीदात्री मंदिर सागर –** दुर्गा मातेचे नववे रूप आहे सिद्धीदात्री, तसेच सिद्धीदात्री देवीचे हे मंदिर मध्यप्रदेशमधील सागर मध्ये स्थित आहे. देवी आपल्या समर्पित भक्तांना प्रत्येक प्रकारची सिद्धी देते याकरिता दिवीचे नववे रूप सिद्धीदात्री म्हणून ओळखले जाते.



## भारतातील ५ प्रसिद्ध महालक्ष्मी मंदिर

- **महालक्ष्मी मंदिर, कोल्हापूर :** महाराष्ट्रातील कोल्हापुरात असलेले महालक्ष्मी मंदिर हे जागृत प्रसिद्ध मंदिर मानले जाते. अंबाबाई नावाने देखील देवीआई महाराष्ट्रात पूजली जाते. तसेच हे मंदिर ७ व्या शतकातील चालुक्य वंशाचा शासक कर्णदेव याने बांधले होते. प्रचलित आख्यायिकेनुसार येथील लक्ष्मी मूर्ती सुमारे ७,००० वर्षे जुनी आहे. या मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे येथे सूर्यदेव स्वतः आपल्या किरणांनी लक्ष्मीला अभिषेक करतात. तसेच सूर्यकिरण देवीच्या चरणांची पूजा करतात. कोल्हापूर मधील अंबाबाईच्या मंदिरात शारदीय नवरात्र मोठ्या उत्साहात भव्य आणि दिव्या साजरे केले जाते.
- **महालक्ष्मी मंदिर, मुंबई :** महाराष्ट्रातील मुंबई मध्ये असलेले महालक्ष्मी मंदिर हे या शहरातील सर्वात प्राचीन मंदिरांपैकी एक आहे. तसेच अरबी समुद्राच्या किनाऱ्यावर वसलेले हे मंदिर लाखो लोकांच्या श्रद्धेचे प्रमुख केंद्र मानले जाते. येथे दररोज हजारो भाविक देवी आईच्या दर्शनासाठी जमतात. महालक्ष्मी मंदिरात देवी महालक्ष्मीसोबतच महाकाली आणि महासरस्वतीची देखील मूर्ती आहे. येथे आपल्या मनोकामना नक्कीच पूर्ण होतील असा भाविकांचा ठाम विश्वास आहे. तसेच नवरात्रीमध्ये मोठ्या संख्येने भाविक दर्शन घेतात.
- **पद्मावती मंदिर, तिरुचुरा :** आंध्र प्रदेशात तिरुपतीजवळ तिरुचुरा गावात पद्मावती देवीचे सुंदर जागृत मंदिर आहे. असे मानले जाते की तिरुपती बालाजीच्या मंदिरात केलेल्या मनोकामना तेव्हाच पूर्ण होतात जेव्हा भाविक बालाजीसह देवी पद्मावतीचा आशीर्वाद घेतात. तसेच पौराणिक आख्यायिकेनुसार या मंदिराच्या तळ्यात फुललेल्या कमळाच्या फुलापासून पद्मावती देवीचा जन्म झाला होता. नवरात्रीमध्ये या मंदिरात अनेक भक्त देवीआईचे दर्शन घेतात.
- **महालक्ष्मी मंदिर, इंदूर :** मध्य प्रदेशातील इंदूर येथे असलेले श्री महालक्ष्मी मंदिर हे प्राचीन मंदिर आहे. मल्हारराव होळकर (द्वितीय) यांनी १८३२ मध्ये हे मंदिर बांधले होते. तसेच येथे दररोज हजारो भाविक महालक्ष्मीच्या दर्शनासाठी येतात. तसेच या प्राचीन महालक्ष्मी मंदिरातील सजवलेल्या मूतीर्ला खूप महत्त्व आहे. शारदीय नवरात्री मध्ये देवी आईला विशेष श्रृंगार केला जातो.
- **लक्ष्मीनारायण मंदिर, नवी दिल्ली :** नवी दिल्लीतील लक्ष्मीनारायण मंदिरात देवी लक्ष्मी भगवान विष्णूंसोबत विराजमान आहे. तसेच या मंदिराचा जीर्णोद्धार १९३८ मध्ये उद्योगपती जी. हे डी. बिर्ला यांनी केला होता. जे मूळतः वीरसिंह देव यांनी १६२२ मध्ये बांधले होते. तसेच हे अतिशय जागृत मंदिर मानले जाते. भगवान विष्णू आणि देवी लक्ष्मी यांना समर्पित असलेल्या या मंदिरात नवरात्री मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. येथे भक्तांची प्रत्येक इच्छा पूर्ण होते. असे मानले जाते.

## दसऱ्याला मराठी घरांमध्ये सरस्वती पूजन: विधी, महत्त्व आणि परंपरा



दसऱ्याच्या सणाला मराठी घरांमध्ये सरस्वती पूजन हे विशेष धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व असलेले विधी आहे. सरस्वती, विद्या, बुद्धी, कला आणि सृजनशक्तीची देवी, यांची पूजा दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर केली जाते. हा सण विशेषतः नवरात्रीच्या नवव्या किंवा दहाव्या दिवशी (विजयादशमी) केला जातो. मराठी घरांमध्ये हे पूजन विशेषतः विद्यार्थ्यांसाठी, शिक्षकांसाठी आणि कला क्षेत्राशी संबंधित व्यक्तींसाठी महत्त्वाचे मानले जाते. खाली सरस्वती पूजनाची संपूर्ण माहिती दिली आहेः

**मराठी घरांमध्ये सरस्वती पूजनाचे महत्त्व :**

- **आध्यात्मिक महत्त्व :** सरस्वती माता ही विद्या, बुद्धी, आणि ज्ञानाची अधिष्ठात्री देवता आहे. दसऱ्याला तिची पूजा केल्याने बुद्धी तीव्र होते, शिक्षणात यश मिळते आणि सृजनशक्ती वाढते. दसरा हा विजयाचा सण आहे, आणि सरस्वती पूजनामुळे जीवनातील अज्ञानरूपी अंधाराचा नाश होऊन ज्ञानाचा प्रकाश प्राप्त होतो.
- **सांस्कृतिक महत्त्व :** मराठी संस्कृतीत दसऱ्याला सीमोल्लंघन आणि शस्त्र पूजा यांच्यासोबत सरस्वती पूजनही केले जाते, कारण हा दिवस नवीन कार्य सुरू करण्यासाठी शुभ मानला जातो. विद्यार्थ्यांमध्ये पुस्तके, वाद्ये, आणि शैक्षणिक साहित्याची पूजा करण्याची प्रथा आहे, ज्यामुळे त्यांना अभ्यासात प्रगती मिळते. काही ठिकाणी, दसऱ्याला सरस्वती पूजनानंतर विद्यारंभ (लहान मुलांचे अक्षरारंभ) विधीही केला जातो.
- **प्रादेशिक प्रथा :** महाराष्ट्रात, विशेषतः पुणे, मुंबई, कोल्हापूर, नाशिक, सातारा यासारख्या भागात सरस्वती पूजन मोठ्या भक्तिभावाने केले जाते. काही घरांमध्ये नवरात्रीच्या पहिल्या दिवसापासूनच (घटस्थापना) सरस्वती पूजन सुरू होते आणि दसऱ्याला त्याची सांगता केली जाते.

**सरस्वती पूजनाची तयारी :**

**शुभ मुहूर्त :** दसऱ्याच्या दिवशी सरस्वती पूजनासाठी पंचांगानुसार शुभ मुहूर्त निवडला जातो. सामान्यतः सकाळचा किंवा प्रदोष काळ हा पूजेसाठी उत्तम मानला जातो.

काही ठिकाणी नवरात्रीच्या सातव्या, आठव्या आणि नवव्या दिवशीही सरस्वती पूजन केले जाते.

**पूजा सामग्री :**

- सरस्वती मातेची मूर्ती किंवा चित्र
- लाल किंवा पांढरे कापड (आसनासाठी)
- पुस्तके, वह्या, पेन, वाद्ये (जसे, वीणा, हार्मोनियम) किंवा शैक्षणिक साहित्य
- हळद, कुंकू, अक्षता (तांदूळ), गंध, फुले (विशेषतः कमळ किंवा पांढरी फुले)
- तुपाचा किंवा तेलाचा दिवा, अगरबत्ती
- प्रसाद (खडीसाखर, पेढे, फळे, खीर किंवा हलवा)
- तांबूल (सुपारी, पान, खोबरे)
- सरस्वती यंत्र (वैकल्पिक)
- गिलकी फळ किंवा पाने (काही ठिकाणी प्रथेनुसार)

**घराची स्वच्छता:**

- पूजेसाठी घर स्वच्छ करावे. रांगोळी काढून पूजास्थान सजवावे.
- पूजेची जागा शांत आणि पवित्र ठेवावी.

**सरस्वती पूजनाचा विधी :**

- **संकल्प :** पूजा सुरू करण्यापूर्वी हातात अक्षता, पाणी आणि फूल घेऊन संकल्प करावा. उदाहरणार्थ : ''मी आज विजयादशमीच्या शुभदिनी माता सरस्वतीचे पूजन करून बुद्धी, ज्ञान आणि यश प्राप्त करण्यासाठी हा विधी करीत आहे.''
- **पूजास्थान तयार करणे :** लाकडी पाटावर किंवा स्वच्छ जागेवर पांढरे किंवा लाल कापड पसरावे. त्यावर सरस्वती मातेची मूर्ती किंवा सरस्वतीचे चिन्ह असलेले चित्र काढून ते ठेवावे. मूर्तीसमोर पुस्तके, वह्या, पेन, वाद्ये किंवा इतर शैक्षणिक साहित्य व्यवस्थित ठेवावे.
- **देवीचे आवाहन आणि स्थापना :** सरस्वती मातेचे ध्यान करून तिचे आवाहन करावे. मंत्रः ''ॐ ऐं सरस्वत्यै नमः'' किंवा ''या कुन्देन्दु तुषारहार धवला...'' ही सरस्वती स्तुती म्हणावी. मूतीर्ला किंवा चित्राला हळद-कुंकू, अक्षता, फुले आणि गंध अर्पण करावे.
- **दिवा आणि अगरबत्ती प्रज्वलन :** तुपाचा किंवा तेलाचा दिवा प्रज्वलित करावा आणि अगरबत्ती लावावी. यामुळे पूजास्थानात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते.
- **पूजा आणि मंत्र जप :** सरस्वती मातेला पांढरी फुले (कमळ किंवा जाई-जास्वंद) अर्पण करावी. ११, २१ किंवा १०८ वेळा जप करावा. काही ठिकाणी सरस्वती वंदना किंवा सरस्वती सूक्त पठण केले जाते.
- **सरस्वती गायत्री मंत्र:** ''ॐ ऐं वाग्देव्यै विद्महे कामराजाय धीमहि। तन्नो देवी प्रचोदयात्॥''।
- **महासरस्वती मंत्र :** ''ॐ ऐं ह्रीं क्लीं महासरस्वती देव्यै नमः''।
- **सरस्वती मूल मंत्र:** ''ॐ ऐं सरस्वत्यै ऐं नमः'' किंवा ''ॐ सरस्वत्यै नमः''।
- **सरस्वती ध्यान मंत्र :** ''ॐ सरस्वती मया दृष्ट्वा, वीणा पुस्तक धारणीम्। हंस वाहिनी समायुक्ता मां विद्या दान करोतु मे ॐ।''।
- **विद्या मंत्र :** ''सरस्वति महाभागे विद्ये कमललोचने। विद्यारूपे विशालाक्षि विद्यां देहि नमोऽस्तु ते॥''।
- **पुस्तक आणि शस्त्र पूजा :** पुस्तके, वह्या, पेन, आणि वाद्ये यांना हळद-कुंकू लावून त्यांची पूजा करावी. काही घरांमध्ये शस्त्रे (जसे, चाकू, तलवार) किंवा औजारे (जसे, हातोडा, पाना) यांचीही पूजा केली जाते, कारण दसरा हा शस्त्र पूजेचा दिवस आहे.
- **आरती आणि प्रसाद :** सरस्वती मातेची आरती करावी. प्रसाद म्हणून खडीसाखर, फळे किंवा खीर अर्पण करावी आणि नंतर सर्वांना वाटावी.

**मराठी घरांमधील खास प्रथा :**

- **पुस्तक पूजा :** विद्यार्थ्यांमध्ये दसऱ्याला पुस्तके आणि वह्या पूजास्थानावर ठेवण्याची प्रथा आहे. या दिवशी अभ्यास करत नाहीत, कारण पुस्तकांना ''देवतेचे रूप'' मानले जाते. काही ठिकाणी पुस्तकांवर पांढरे कापड घालून त्यांना हार घालतात.
- **विद्यारंभ संस्कार :** दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर लहान मुलांचे अक्षरारंभ (पहिली अक्षरे शिकवणे) केले जाते. यासाठी स्लेट, खडू किंवा पाटी-पेन यावर सरस्वती मंत्र लिहून मुलांना शिकवले जाते.
- **सांस्कृतिक कार्यक्रम :** काही मराठी घरांमध्ये किंवा समुदायात दसऱ्याला सरस्वती पूजनानंतर कविता वाचन, संगीत, नृत्य किंवा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात, कारण सरस्वती माता कला आणि सृजनशक्तीची देवता आहे.
- **शमी पूजा आणि गिलकी :** मराठी घरांमध्ये दसऱ्याला शमी वृक्षाची पूजा आणि गिलकी (बेल) फळाचा उपयोग केला जातो. काही ठिकाणी गिलकीच्या पानांचा उपयोग सरस्वती पूजेतही केला जातो, कारण ती पवित्र मानली जाते.

**आयुर्वेदिक आणि प्रतीकात्मक दृष्टिकोन :**

सरस्वती पूजनामुळे मन शांत आणि एकाग्र होते, जे अभ्यास आणि सृजनशील कायासाठी आवश्यक आहे.

गिलकी फळ आणि पाने यांचा उपयोग पूजेत केल्याने सकारात्मक ऊर्जा निर्माण होते.

पांढऱ्या रंगाचे फुले आणि कापड यांचा वापर सरस्वती मातेच्या शुद्ध आणि शांत स्वरूपाचे प्रतीक आहे.

मराठी घरांमध्ये दसऱ्याला सरस्वती पूजन हे ज्ञान, बुद्धी आणि सृजनशक्ती यांचे प्रतीक आहे. हा विधी विशेषतः विद्यार्थ्यांसाठी आणि कला क्षेत्रातील व्यक्तींसाठी महत्त्वाचा आहे. पूजा, मंत्र जप, आणि पुस्तक-शस्त्र पूजन यांमुळे दसऱ्याचा सण अधिक शुभ आणि अर्थपूर्ण होतो. मराठी परंपरेनुसार, हे पूजन कौटुंबिक एकता आणि सांस्कृतिक मूल्यांचे जतन करते.

# पावसाची विश्रांती... पूरस्थिती कायम!!!

## पूरग्रस्त शेतकऱ्यांना हवा मदतीचा आधार... अतिवृष्टी, गारपीट, टंचाईग्रस्तांना जिल्हा वार्षिक निधीतून मदत

**■बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

यंदा पावसाने धुमाकूळ घातला असून राज्यात विविध जिल्ह्यांत पूरस्थिती निर्माण झाली आहे. मराठवाडा, विदर्भ, नाशिक जिल्ह्यात पूर आणि अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. फक्त शेतकऱ्यांची पिके पावसाच्या पाण्यात वाहून गेली नसून त्यांची घरे, सामान, विद्यार्थ्यांची वह्या-पुस्तके या सर्वांचेच नुकसान झाले आहे. त्यामुळे झोडपलेल्या पावसाने काहीशी उसंत घेतली असली तरी शेतकऱ्यांना आता मदतीचा आधार हवा आहे. त्यामुळेच नैसर्गिक आपत्तीत नागरिकांना तत्काळ मदत करता यावी, यासाठी आता जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत (सर्वसाधारण) निधीचा उपयोग करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. अतिवृष्टी, पूरस्थिती, गारपीट, टंचाई अशा परिस्थितीत या निधीचा वापर करता येणार आहे. वातावरणीय बदलामुळे कधी उन तर कधी पाऊस अशी स्थिती राज्यात निर्माण झाली आहे. त्यामुळे अतिवृष्टी, पूरस्थिती, गारपीट टंचाई अशा परिस्थितीत या निधीचा वापर करता येणार आहे. राज्यात आपत्कालीन परिस्थितीत मदतीसाठी राज्य सरकारच्या मंजुरीची प्रतीक्षा आता जिल्हाधिकाऱ्यांना करावी लागणार नाही.



गेल्या काही वर्षांत वातावरणात बदल झाला आहे. सद्यस्थितीत मराठवाडा, परभणी, अमरावती, अकोला, धाराशिव, सोलापूर आदी जिल्ह्यात पावसाने थैमान घातले आहे. याठिकाणी मदतकार्याला वेग आला असून भविष्यात आपत्कालीन परिस्थितीत तातडीने मदत मिळावी यासाठी आता जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत निधी खर्च करण्यास राज्य सरकारने मंजुरी दिली आहे. नैसर्गिक आपत्तींवर तातडीच्या उपाययोजनांसाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून एकूण जिल्हा वार्षिक निधीच्या ५ टक्क्यांपर्यंत खर्च करण्याची मुभा असणार आहे. यापूर्वी केवळ टंचाईसाठी निधी वापरण्याची मुभा होती, पण आता पूर, अतिवृष्टी, गारपीट यांसाठी देखील जिल्हा वार्षिक योजनेतील निधी वापरता येईल. २४ तासात एकूण ६५ मिमी पाऊस पडल्यामुळे अतिवृष्टी झाल्याने नुकसान झालेल्या भागात तसेच पूर परिस्थितीने बाधित गावांमध्ये या उपायोजना करण्यात येणार आहेत. तसेच तातडीच्या उपाययोजनांसाठीचा खर्च करण्याची प्रशासकीय मंजुरी देण्याचे अधिकार पालकमंत्री तथा अध्यक्ष जिल्हा नियोजन समिती यांना असणार आहे. याबाबत सोमवारी शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

महसूलमंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी कळमेश्वर तालुक्यात असलेल्या मौजा दाढेरा, तिडंगी, तेलगाव, नांदा गोमुख व जिल्ह्यातील इतर गावांतील कृषी क्षेत्राची पाहणी केली. ते म्हणाले की, ''मराठवाड्यासह राज्यातील अनेक भाग उद्ध्वस्त झाले आहेत. राज्याच्या प्रत्येक भागात शासन शेताच्या बांधावर जाऊन पंचनामे करत आहे. या संकटातून शेतकऱ्यांना सावरण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वेळप्रसंगी ड्रोनच्या सहाय्याने व याचबरोबर प्रत्यक्ष पंचनाम्याच्या माध्यमातून अधिकाधिक मदत केली जाईल, असे सांगितले आहे. आम्ही वेळप्रसंगी निकष बाजूला ठेवून शेतकऱ्यांना अधिकाधिक मदत करू.''

**असा वापरता येणार जिल्हा वार्षिक निधी!**

- जिल्हा वार्षिक योजना निधीतील ९५ टक्के रक्कमेतून ५ टक्के अतिवृष्टी-गारपीट-पूर उपाययोजनांसाठी आणि ५ टक्के टंचाई निवारणासाठी वापरता येणार आहे.
- जर परिस्थिती गंभीर असेल तर जिल्हा नियोजन समितीच्या मान्यतेने एकूण निधीच्या १० टक्क्यांपर्यंत वापरण्याची मुभा असणार आहे.
- एका जिल्ह्यात टंचाई व अतिवृष्टी दोन्ही संकटे उद्भवल्यास, एकाच निधीचा लवचिक वापर करता येणार आहे.
- जिल्हा नियोजन समितीचे अध्यक्ष म्हणून पालकमंत्र्यांना तातडीने निधी मंजूर करण्याचे अधिकार वापरता येणार आहेत.
- खर्चाचा तपशील जिल्हाधिकाऱ्यांनी दर महिन्याच्या १० तारखेपर्यंत मदत व पुनर्वसन विभागाला अहवाल स्वरूपात सादर करणे बंधनकारक आहे.

जिल्हा वार्षिक योजनेच्या या निधीतून करण्यात येणाऱ्या कामांमध्ये नागरिकांना मदत कॅम्पमध्ये हलवणे, वैद्यकीय सुविधा पुरवणे, पिण्याच्या पाण्याची सोय, चारा-छावण्या, तुटलेल्या रस्त्यांची आणि पुलांची तात्पुरती दुरुस्ती, गॅस-पेट्रोल पंपांची दुरुस्ती, वीज पुरवठा सुरळीत करणे, तसेच गावांमधील शाळा, अंगणवाडी आणि सार्वजनिक इमारतींची दुरुस्ती तसेच टंचाईसाठी विहिरी, टँकर, सिंटेक्स टाक्या अशा एकूण २२ प्रकारच्या तातडीच्या उपाययोजनांचा समावेश आहे.

''राज्यातील अनेक भागांत अतिवृष्टीमुळे शेतकरी व सामान्य नागरिकांचे अपरिमित नुकसान झाले आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था अक्षरशः कोलमडून पडली आहे. शहरी भागांनाही याची झळ पोहोचली आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने आपत्ती निवारणाची काही महत्त्वपूर्ण कामे तातडीने हाती घ्यावीत, असे मी सुचवू इच्छितो. पंचनामा प्रक्रियेसाठी ठराविक मुदतीचे बंधन नसावे. नुकसानभरपाईसोबत पुनरुज्जीवन कार्यक्रमाचा आराखडा तयार करणे. साहित्य वाटपाचा कार्यक्रम हाती घ्यावा. तसेच शेतकरी हिताचे निर्णय घेऊन त्यांना मानसिक व सामाजिक आधार देण्याची गरज आहे,'' असे राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी राज्य सरकारला सुचवले आहे.

---

## 'लाडक्या बहिणी' चिंताग्रस्त! योजनेतून बाद होण्याची भीती



**■मुंबई । प्रतिनिधी,**

लाडक्या बहिणींना 'ई-केवायसी' दोन महिन्यांत पूर्ण करणे बंधनकारक असल्याचे महिला व बालविकास विभागाकडून जाहीर करण्यात आले आहे. मात्र, 'ई-केवायसी' करताना पोर्टलच बंद असणे, ओटीपी न येणे अशा विविध तांत्रिक अडचणींचा फटका लाडक्या बहिणींना बसत आहे. त्यामुळे दोन महिन्यांत 'ई-केवायसी' न झाल्यास योजनेतून बाद होण्याची चिंता 'लाडक्या बहिणीं'ना सतावत आहे. त्यामुळे महायुतीची ही महत्त्वाकांक्षी योजना पुन्हा एकदा वादात सापडण्याची चिन्हे आहेत. विधानसभा निवडणुकीपूर्वी 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजनेची घोषणा तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आणि त्यानंतर त्याची तातडीने अंमलबजावणी सुरू केली. पात्र महिलांच्या बँक खात्यात महिना १५०० रुपये जमा होण्यास सुरुवात झाली. मात्र, दर महिना १५०० रुपयांप्रमाणे २ कोटी ४७ लाख महिलांच्या बँक खात्यात पैसे जमा करताना महायुती सरकारची आता दमछाक होऊ लागली आहे. त्यामुळे प्राप्त अर्जांची छाननी प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यातून १० लाखांहून अधिक महिला योजनेतून बाद झाल्या आहेत. मात्र, पात्र महिलांची संख्या आणखी कमी करण्यासाठी राज्य शासनाने आता 'ई केवायसी' करणे बंधनकारक केले आहे. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेतील सर्व लाभार्थी भगिनींसाठी ladakibahin.maharashtra.gov.in या वेब पोर्टलवर ह्यई केवायसीह्न सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. लाडक्या बहिणींना २० नोव्हेंबरपर्यंत 'ई केवायसी' करणे बंधनकारक आहे. मात्र, वेब पोर्टल सुरूच न होणे, ओटीपी न येणे अशा तक्रारींचा पाढा लाभार्थी महिलांकडून सध्या वाचला जात आहे.

---

## एका रात्रीत ३७ गायी, २० शेळ्यांचा बळी!!!

### पुरामुळे दुग्धव्यवसाय उद्ध्वस्त... धाराशिवच्या शेतकऱ्याचे ६० लाखांचे नुकसान, मदत अपुरी

**■बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

मराठवाड्यातील पुरामुळे शेतकरी आणि दुग्धव्यवसायिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. धाराशिव जिल्ह्यातील भूम तालुक्यातील तेलगाव पिंपळगाव येथील दुग्ध उत्पादक श्रीराम दातखिळे (वय ५५) यांचे सर्वस्व एका रात्रीत उद्ध्वस्त झाले. २३ सप्टेंबर रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे बाणगंगा नदीला पूर आला आणि त्यांच्या ३७ गायी व २० शेळ्या मृत्युमुखी पडल्या.

दातखिळे कुटुंबीय ८ सदस्यांसह दुग्धशाळा चालवत होते. महिन्याला साधारण ३.५ लाख रुपये उत्पन्न मिळून त्यातून ४० टक्के नफा होत होता. मात्र, पुरामुळे कुटुंबाला तब्बल ६० लाख रुपयांचे नुकसान सहन करावे लागले. ''त्या रात्री आम्हाला स्वतःला वाचवण्यासाठी केवळ ७ ते ८ मिनिटे मिळाली. दोन प्राणी वाचवले, पण उरलेले सर्व प्राणी वाहून गेले. काही मिनिटांतच आमचं सर्वस्व गमावलं,'' असे प्रवीण दातखिळे यांनी सांगितले.

सध्या हे कुटुंब ओळखीच्या व्यक्तीच्या कांदा शेडमध्ये आसरा घेत आहेत. फक्त प्राण्यांचेच नाही तर कुटुंबाच्या पेरू बागेचेही मोठे नुकसान झाले आहे. शासनाच्या नियमांनुसार केवळ ३ जनावरांसाठी प्रति ३७,५०० इतकीच भरपाई मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.



लातूरमधील एका शेतकऱ्याची ५.५ एकर जमीन पुरात बुडाली, तर खताच्या पिशव्या सुद्धा खराब झाल्या. त्याच्याकडे खासगी सावकाराचे ४० लाखांचे कर्ज असून परतफेड न झाल्यास तो आत्महत्येचा विचार करीत आहे. नांदेडमध्येही एका शेतकऱ्याने पुरामुळे ४० म्हशी व १५ गायी गमावल्या. अपुऱ्या भरपाईमुळे त्यानेही आत्महत्येचा इशारा दिला आहे.

शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, लम्पी स्किन रोगामुळे विमा कंपन्या गुरांचा विमा काढत नाहीत. त्यामुळे नुकसानीची भरपाई शून्यच राहते. शासनाने तातडीने पीककर्ज माफी जाहीर करून मोठा मदतीचा पॅकेज जाहीर करावा, अशी मागणी शेतकरी संघटनांनी केली आहे.

**दरम्यान, शेतकऱ्यांसाठी कार्यरत असलेल्या ह्यशिवारह्न या हेल्पलाइनवर पुरग्रस्त शेतकऱ्यांचे संकटमय फोन सतत येत असल्याचे संस्थापक विनायक हेगाना यांनी सांगितले. "हेल्पलाइन सुरु झाल्याच्या पहिल्याच दिवशी २७४ कॉल आले, त्यापैकी ८३ शेतकऱ्यांनी आत्महत्येचे विचार मनात असल्याचे स्पष्ट केले,"असे त्यांनी सांगितले.**

---

## कारागृहाबाहेर दहशत माजवणाऱ्यांची पोलिसांनी काढली धिंड



**■नाशिक। प्रतिनिधी:**

अंबडमधील गुन्हेगार संशयित महेश सोनवणे ऊर्फ चिमण्या हा खून केल्यानंतर तुरुंगात गेला होता. तो २० सप्टेंबर रोजी सायंकाळी ८ वाजेदरम्यान नाशिकरोड मध्यवर्ती करारागृहातून सुटला. त्याच्या समर्थनासाठी संशयित आरोपी प्रतीक सोनवणे, यश गीते, मोनू सोनवणे, उमेश फसाळे, प्रमोद सावडेकर, श्रावण पगारे ,सुमित बगाटे ,मुन्ना साळवे, रामू नेपाळी व इतर अनोळखी २० जणांनी धारदार शस्त्र बाळगून कार व दुचाकी वाहनावर जाताना रस्त्यावर येणारे जाणारे सामान्य लोकांना व वाहनांना वाहतुकीस मज्जाव करून अंगावर धावून जाऊन दहशत निर्माण केली. या संशयितांची नाशिकरोड पोलिसांनी धरपकड धिंड काढली.

---

## बालसुधारगृहातून पळालेल्या बालकाने केला दुसरा खून

**■नाशिक। प्रतिनिधी:**

मनमाड बालसुधारगृहातून पळालेल्या विधीसंघर्षित बालकाने दुसरा खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. फिरस्त्याच्या खूनप्रकरणाचा उलगडा करण्यात मुंबई नाका पोलिसांना यश आले आहे. मैत्रिणीची छेड काढल्याने २ सप्टेंबर रोजी सीबीएस बसस्थानकाच्या प्रवेशव्दाराजवळ फिरस्त्याचा खून करणारा आणि मुंबई-आग्रा महामार्गाच्या उड्डाणपुलाखाली फिरस्त्याचाही खून करणारा एकच आरोपी असल्याचे निष्पन्न झाले आहे. पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले आहे.

बंडू लक्ष्मण गांगुर्डे (३५ मुळ रा. बाऱ्हे. ता. सुरगाणा, सध्या रा. उड्डाणपुलाखाली, वडाळानाका) असे मृत्यू झालेल्या फिरस्त्याचे नाव आहे. विधीसंघर्षित बालकावर खूनाचे दोन व चोरी असे एकूण सात गुन्हे नोंद आहेत २ सप्टेंबर रोजी एका भिक्षेकऱ्याचा डोक्यात दगड घालून खून केला होता त्याला ताब्यात घेऊन बाल न्याय मंडळाच्या आदेशाने मनमाड बालसुधारगृहात दाखल करण्यात आले होते. काही दिवसांतच त्याने तेथून पलायन करुन नाशिक गाठले त्याने शुक्रवारी गांगुर्डे यांचा खून केला

आक्की बंडू गांगुर्डे यांच्या फियार्दीनुसार व मुंबई नाका पोलिसांच्या माहितीनुसार, मोलमजुरी करणारे गांगुर्डे दाम्पत्य काही दिवसांपासून वडाळा नाका भागातील उड्डाणपुलाखाली वास्तव्यास आहे. दाम्पत्य भिक्षा मागून अथवा मजुरी करून उदनिर्वाह भागवत होते. शुक्रवारी (दि. २६) रात्री नऊ वाजेच्या सुमारास दाम्पत्य पुलाखाली स्वयंपाकाची तयारी करत असताना काही अंतरावर विधीसंघर्षिताने गांगुर्डे दांम्पत्याच्या झोपण्याच्या जागेवर लघुशंका करताना दिसला. त्यावेळी बंडू यांनी त्यास समजावून विरोध केल्याने संतप्त विधिसंघर्षिताने बंडू याच्यावर धारदार चाकूने सपासप वार केले. अक्काबाई हिने धाव घेतल्याने त्याने पळ काढला. गंभीर जखमी बंडूवर अन्य भिकारींच्या मदतीने रात्री घरगुती (गावठी) औषधोपचार करण्यात आले. त्यांना शनिवारी सकाळी जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, अतिरक्तश्रावानंतर उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. पुढील तपास हवालदार यादव डंबाळे करत आहेत.

---

## पत्नीच्या डोळ्यात चटणी टाकून कोयत्याने सपासप वार; आरोपी पती पोलिसांच्या ताब्यात

**■हातकणंगले। प्रतिनिधी:**

कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले तालुक्यात भदोले गावात कोयत्याचे वार करत पतीने पत्नीचा खून केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. सोमवारी रात्री आठच्या सुमारास भादोले-कोरेगाव रस्त्यावरील ओढ्याच्या पुलाजवळ ही घटना घडली आहे. भदोले येथील रोहिणी प्रशांत पाटील (वय २९) हिचा पती प्रशांत मारुती पाटील ऊर्फ गुंडा मिस्त्री याने कोयत्याचे सपासप वार करत खून केला आहे. खुनाचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पसार झालेला प्रशांत मारुती पाटील याला वडगाव पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

**डोळ्यात चटणी फेकून कोयत्याने वार**

भादोले येथे राहणारा प्रशांत पाटील याचा ग्रामपंचायतच्या गाळ्यात दुचाकी दुरुस्तीचे गॅरेज आहे. त्याचा ८ वर्षांपूर्वी ढवळी (ता. वाळवा) येथील रोहिणी हिच्यासोबत विवाह झाला होता. त्यांना ३ वर्षांची एक आणि ६ वर्षांची अशा दोन मुली आहेत. रोहिणीचे वडील म्हणजेच प्रशांतचे सासरे आजारी असल्याने वारंवार रोहिणीला माहेरी जावे लागत होते. दुपारी दोघेही दुचाकीवरून ढवळीला (रोहिणीच्या माहेरी) गेले



होते. रात्री आठच्या सुमारास परत येत असताना वारणा नदीचा पूल ओलांडल्यानंतर गावानजीक असणाऱ्या ओढ्याजवळ प्रशांतने गाडी थांबवून रोहिणीच्या डोळ्यात चटणी फेकली आणि कोयत्याने डोक्यात सपासप वार केले. अचानक झालेल्या या हल्ल्याने रोहिणी जागीच कोसळली. डोक्यात व मानेवर गंभीर वार झाल्याने रक्तस्त्राव होऊन तिचा जागीच मृत्यू झाला. हे वार चुकवण्याच्या प्रयत्नात रोहिणीच्या दोन्ही हातांवरदेखील कोयत्याचे वार आढळून आले आहेत.

**मृतदेह पाहून घरचे हादरले...**

निर्मनुष्य ठिकाण, त्यात रात्रीची वेळ असल्याने रोहिणीला बचाव करण्यासाठी करता आला नाही. सपासप वार केल्यानंतर रोहिणीच्या अंगावरच कोयता टाकून प्रशांतने तिथून पळ काढला. आपण रोहिणीचा खून करून आलो असल्याचे त्याने घरी जाऊन सांगितले. कुटुंबीयांनी घटनास्थळी जाऊन खात्री केली असता रोहिणीचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात पडल्याचे पाहून हादरले. त्यानंतर वडगाव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळी कोयता आणि हातोडा देखील पडला होता.

**ढवळीतील शेकडो ग्रामस्थ प्रशांतच्या गॅरेजसमोर जमले**

याप्रकरणी पोलिस निरीक्षक प्रमोद शिंदे यांच्या यांच्या पथकाने घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पारगाव ग्रामीण रुग्णालयात पाठविला. वडगाव पोलीस स्थानकात रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते. दरम्यान, ही खुनाची घटना समजताच रोहिणीचे माहेर असणाऱ्या ढवळी येथील शेकडो ग्रामस्थ व नातलगांनी भादोले येथे संतप्त होत धाव घेतली. संतप्त झालेले हे सर्वजण संशयित प्रशांतच्या गॅरेजसमोर जमले होते. पसार झालेल्या प्रशांत याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. दरम्यान, हत्येचे कारण अद्याप अस्पष्ट आहे. पोलीस चौकशी करत आहेत.

---

## फ्लॅट, बंगल्यात सकाळच्यावेळी चार्जिंगला लावलेले मोबाईल, लॅपटॉप चोरणारी टोळी गजाआड

**■नाशिक। प्रतिनिधी:**

नाशिक शहरात सातपूर, पंचवटी व सरकारवाडा पोलीस ठाणे हद्दीत मोबाईल व लॅपटॉप चोरी केल्याची कबुली दिली असून, त्यांच्याकडून आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे. रामू बालराज (वय ४०, दोघेही रा. बोडगुटपल्ली, कोटामंडल, जि. चित्तुर, आंध्रप्रदेश, सत्यवेल श्रीनिवासु (३६) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. सातपूरमधील जाधव संकुल परिसरातील सुयोग कलेक्शनमध्ये चोरट्यांनी शुक्रवारी (दि.२६) सकाळी ७.४० ते ९ वाजेदरम्यान दरवाजातून प्रवेश करून एचची व डेल कंपनीचे प्रत्येकी दोन लॅपटॉप लंपास केले. याप्रकरणी सातपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. या गुन्ह्याचा तपास सातपूर पोलीस व नाशिक शहर गुन्हे शाखा युनिट १ च्या पथकाने समांतर सुरू केला.गुन्हे शाखा युनिट क्रमांक १ चे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी चोरीच्या ठिकाणी भेट देवून पाहणी केली.

पोलीस हवालदार नाझीमखान पठाण, संदीप भांड, विशाल काठे, अंमलदार अमोल कोष्टी यांना तपास सुरू केला. हवालदार पठाण व अंमलदार कोष्टी यांना लॅपटॉप चोरटे आंध्रप्रदेशमधील चित्तुर येथे पळून जाणार असल्याची माहिती दिली. ही बाब त्यांनी गुन्हे शाखा युनिट १ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ. अंचल मुदगल यांना दिली. त्यांनी सदर ठिकाणी जावून खात्री करून कायदेशीर कारवाई करणेबाबत पथकाला सूचना दिल्या. त्यानुसार पथकाने रेल्वेने पळून जाण्याच्या



तयारीत असलेल्या दोन जणांना ताब्यात घेतले. पथकाने त्यांच्या ताब्यातून सातपूरमध्ये चोरी केलेले दोन लॅपटॉप जप्त केले. पोलीस चौकशीत दोघांनी चित्तुरचा साथीदारत आनंद नित्यानंद (वय १९) व एका विधीसंघर्षित बालकासोबत नाशिक शहरात लॅपटॉप व मोबाईल चोरी केल्याची कबुली दिली.

पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, पोलीस उपायुक्त किरणकुमार चव्हाण, सहायक पोलीस आयुक्त संदीप मिटके यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ. अंचल मुदगल, उपनिरीक्षक चेतन श्रीवंत, सुदाम सांगळे, हवालदार प्रविण वाघमारे, विशाल काठे, नाझीमखान पठाण, प्रदिप म्हसदे, संदीप भांड, विशाल देवरे, प्रशांत मरकड, मिलींदसिंग परदेशी, रोहिदास लिलके, महेश साळुंके, धनंजय शिंदे, उत्तम पवार, राजेश लोखंडे, अंमलदार अमोल कोष्टी, मुक्तार शेख, जगेश्वर बोरसे, अनुजा येलवे, चालक समाधान पवार यांनी केली.

**पोलिसांचे नागरिकांना आवाहन**

नाशिक शहरातील फ्लॅट, बंगले, दुकान व कार्यालयातून ज्या नागरिकांचे सकाळच्या वेळी चार्जिंगला ठेवलेले मोबाईल, लॅपटॉप चोरीला गेले आहेत, अशा नागरिकांनी सातपूर पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन नाशिक शहर पोलिसांनी केले आहे.

**पळून जाण्यासाठी रेल्वे स्टेशन परिसरात घेतली होती रूम**

आंध्रप्रदेशमधून नाशिकमध्ये चोरीसाठी आलेल्या चोरट्यांनी नाशिकरोड रेल्वे स्टेशन परिसरात भाड्याने रूम घेतली होती. नाशिक शहरात चोरी केल्यानंतर रेल्वेने पटकन पळून जाता यावे, यासाठी रेल्वे स्टेशन परिसरात रूम घेतल्याचे पोलीस तपासात समोर आले. दोन जणांना पोलिसांनी सीबीएस व इतर दोघांना नाशिकरोड रेल्वे स्टेशन परिसरात ताब्यात घेतले. विशेष म्हणजे, मानवी कौशल्याच्या आधारे पोलीस अंमलदार नाझीमखान पठाण चोरट्यांपर्यंत पोहोचले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com